**तक्रारदारतर्फे साक्षीदार क्रमांक ०१ ची साक्ष**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस.एन.पई यांचे मार्फत.**

१५. मी पोल्ट्रीचा व्यवसाय करतो. माझे १२ वी पर्यंत शिक्षण झालेले आहे. मी सिव्हील इंजिनिअरींगच्या कामाबाबत कुठलेही प्रशिक्षण घेतलेले नाही. माझी राष्ट्रीय पेजल योजनेच्या साईटवर सुपरवायझर म्हणून नेमणूक केली होती ही बाब दर्शविण्यासाठी माझ्याकडे कुठलाही कागदोपत्री पुरावा नाही. माझ्याकडे कुठली राष्ट्रीय पेजल योजनेबाबतचा माझ्याकडे कागदोपत्री पुरावा आहे. मी सदर कामाचे इस्टीमेट न्यायालयामध्ये सादर करु शकतो. मी सदरचे इस्टीमेट उपलब्ध झाल्यास पुढील तारखेपर्यंत दाखल करु शकतो. सदर योजनेचा ठेकेदार हा पावसकर होता. मला राष्ट्रीय पेजल योजनेची निविदा काढल्याची नेमकी तारीख सांगता येणार नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की सन २०१७–२०१८ साली काढली होती. मी राष्ट्रीय पेजल योजनेच्या साईटवरती सुपरवायझर म्हणून काम केले होते ही बाब दर्शविण्यासाठी माझ्याकडे कुठलाही सरकारी कागदोपपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी रुपये २,३०,०००/– देणे कसे लागत होता याबाबतचा तपशिल माझ्याकडे नाही. माझ्याकडे सदरचा तपशिल हा तोंडी स्वरुपात आहे. मी सदर रक्कमेचा तपशिल माझ्या तक्रारीमध्ये नमूद केलेला नाही. मला तक्रारीमध्ये सदर रक्कमेचा तपशिल देण्यासाठी कुठलीही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याकडे कुठलाही रक्कमेचा तपशिल नव्हता त्यामुळे सदरचा तपशिल माझ्या तक्रारीमध्ये माझ्या पुराव्याच्या शपथपत्रामध्ये दिलेला नाही.

१६. नरेंद्र गजानन पावसकर हे माझे मित्र आहेत. मी माझ्या तक्रारीमध्ये व शपथपत्रामध्ये आरोपीला किती तारखेला भेटलो व पैशाची मागणी केली ही बाब नमूद केलेली नाही. मला वरील माहिती माझ्या फिर्यादीमध्ये व शपथपत्रामध्ये नमूद करण्यासाठी कुठलीही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला कधीही प्रत्यक्षपणे भेटलो नाही व पैशाची मागणी केली नाही त्यामुळे सदरचा तपशिल माझ्या तक्रारीमध्ये व शपथपत्रामध्ये नमूद

नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने मला सुपरवायझर म्हणून नेमले होते व आरोपी मला पैसे देणे लागतो असा दर्शविणारा कुठलाही लेखी करार आमच्यामध्ये झालेला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हा माझा अतिशय चांगला मित्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीची आर्थिक परिस्थिती सधन आहे.

१७. हे म्हणणे खरे नाही की, मला धनादेशावर नमूद असलेला धनादेश क्रमांक व खाते क्रमांक सांगता येणार नाही. आरोपीने मला दिलेले धनादेश क्र. ०२७५७२ व ०२७५७३ असे आहेत. आरोपीच्या खात्याचा शेवटचे क्रमांक १४२३ आहे. मला सदर खात्याचा पुर्ण नंबर सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, धनादेशावरील सही आरोपीची नाही. हे म्हणणे खरे नाही की, धनादेशावरील नाव, रक्कम व तारीख आरोपीने भरलेली नाही. मी दोन्हीही धनादेश दि. २४/०२/२०२२ रोजी वटण्यासाठी बँकेमध्ये जमा केले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी बँकेच्या सही शिक्क्याचा बँकेचा मेमो प्रस्तुत प्रकरणामध्ये दाखल केलेला नाही. धनादेशाच्या रक्कमेची मागणी करणारी नोटीस दि. १६/०३/२०२२ रोजी पाठविली होती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचा ग्रामपंचायत सुकळवाड याच्याशी कुठलाही संबंध नाही. नोटीस मिळालेल्याबाबतच्या पावतीवरती आरोपीची सही आहे तसेच ग्रामपंचायत सुकळवाड यांनी त्यांनी केलेल्या सहीवरती काट मारलेली आहे. मला आता नि.क्र.सी४/सीडब्ल्यू१ वरील पोष्टाची पोच पावती दाखविण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, त्यावरती सरपंच ग्रामपंचायत सुकळवाड ता. मालवण यांचा शिक्का आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर शिक्कयावरती लिहिलेला मजकूर हा सहीसदृश्य आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, काट मारलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या म्हणण्याप्रमाणे काट मारल्याशिवाय इतर कुठलाही मजकूर लिहिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, काट मारलेला मजकूर जेल पेनने लिहिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र. सी१/सीडब्ल्यू१,सी२/सीडब्ल्यू१ वरील धनादेश आणि नि.क्र.सी४/सीडब्ल्यू१ वरील पोष्टाच्या पावतीवरील सहया वेगवेगळया आहेत. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, साम्य असलेल्या सहया आहेत. मी सी४/सीडब्ल्यू१ वरील पावती मिळाल्यानंतर पोष्टामध्ये जावून सदर पावतीवरती ग्रामपंचायत सुकळवाड यांचा शिक्का का आला याबाबत माहिती घेण्याचा

प्रयत्न केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.सी४/सीडब्ल्यू१ वरील नोटीस आरोपीला कधीही मिळाली नव्हती, मी मागाहून सदर पावतीवरती आरोपीची बनावट सही करण्याचा प्रयत्न केलेला आहे. मी तक्रारीसोबत नोटीस पाठविल्याबाबत पोष्टाची पावती दाखल केलेली नाही.

प्रश्न – आरोपीला तुम्ही दि. १६/०३/२०२२ रोजी नोटीस पाठविली होती ही बाब दर्शविण्यासाठी तुमच्याकडे पोष्टाची पावती उपलब्ध नाही ?

उत्तर – माझ्याकडे पोष्टाची पावती उपलब्ध नाही.

१८. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.सी४/सीडब्ल्यू१ वरील नोटीशीवरती नोटीस मिळाल्याची तारीख नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर पोच पावतीवरती केवळ २ व ४ अंक दिसत आहेत, त्यापुढील अंक दिसत नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.सी४/सीडब्ल्यू१ वरील नोटीस पाठविल्याबाबतची पावती माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.सी४/सीडब्ल्यू१ वरील पोष्टाची पोच पावती आरोपीला पाठविलेल्या नोटीशीची आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वरील पोष्टाच्या पोच पावती वरती आरोपीची सही आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, एखादा धनादेश वटण्यासाठी बँकेमध्ये जमा केल्यानंतर त्याबाबतची नोंद बँक खात्यामध्ये घेतली जाते. माझ्या बँकेच्या खात्यामध्ये धनादेश जमा केल्याबाबतची नोंद केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, धनादेश अनादरीत झाल्यानंतर मी आरोपीची भेट घेतली होती, त्यानंतर आरोपीने मला धनादेश वटण्यासाठी परत जमा करण्यासाठी सांगितले होते ही बाब दर्शविण्यासाठी माझ्या शब्दाशिवाय इतर कुठलाही पुरावा माझ्याकडे नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, नरेंद्र पावसकर यांचा पुरावा आहे. मी तक्रारीमध्ये व सरतपासाच्या शपथपत्रामध्ये नरेंद्र पावसकर याचा पुरावा आहे ही बाब नमूद केलेली नाही.

१९. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला कुठलेही कधीही दिलेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीकडे कधीही सुपरवायझर म्हणून काम केलेले नव्हते त्यामुळे आरोपी मला धनादेशात नमूद केलेली रक्कम देणे लागत नाही. हे म्हणणे खरे आहे की,

आरोपीच्या कुटूंबाचा ड्रायव्हींग स्कूलचा व्यवसाय आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचे मिळालेल्या धनादेशाचा गैरवापर करुन लोभाने आरोपीकडून पैसे उकळण्यासाठी खोटी केस दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, धनादेश अनादरीत झाल्याबाबतची कुठलीही नोटीस आरोपीला पोष्टाने पाठविलेली नव्हती व त्यासंदर्भाने आरोपीला कुठलीही नोटीस प्राप्त झाली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी हजर केलेली पोष्टाची पोच पावती खोटी व खोडसाळ असून सदर पोच पावतीशी आरोपीचा कुठलाही संबंध नाही. मी माझ्या तक्रारीमध्ये, पुराव्याच्या शपथपत्रामध्ये व माझ्या अतिरिक्त नोंदविलेल्या सरतपासामध्ये <u>नि.क्र. सी४/सीडब्ल्यू१</u> वरील पोच पावतीवरती ग्रामपंचायतचा शिक्का आहे व सदरचा शिक्का खोडलेला आहे या बाबी नमूद केलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी मला कधीही कायदेशीर देणे लागत नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, धनादेशावरील मजकूर आरोपीने लिहिलेला नाही तसेच त्यावरील सहया आरोपीच्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, रक्कमेची मागणी करण्यासाठी गेलो होतो त्यावेळी नरेंद्र गजानन पावसकर मध्यस्थ म्हणून हजर होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१७–२०१८ सालामध्ये मी राष्ट्रीय पेजल योजनेमध्ये सुपरवायझर म्हणून काम केले होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुतची तक्रार दाखल करताना माझ्याकडे पोष्टाची पावती उपलब्ध नव्हती त्यामुळे सदरची पावती तक्रारीसोबत दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी तक्रार दाखल करताना आवश्यक असलेल्या तरतुदींचे पालन केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी निरर्थक तक्रार दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला नोटीस पाठविलेली नाही त्यामुळे सदरची नोटीस आरोपीला मिळाली नसल्यामुळे आरोपीने माझ्या नोटीशीला प्रतिउत्तर पाठविण्याचा प्रश्न कधीही उद्भवला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, खोटी तक्रार दाखल करुन आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण.

फेरतपास नाही. श्रवणोत्तर स्वीकृत

ठिकाण : मालवण
दिनांक : २४/१२/२०२४

महेश रा. देवकते
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मालवण.